दे धक्का!!
सुराज्य सोलापूर
शुक्रवार, दि. २५ ऑक्टोबर २०२४ । पान १२

होऊ द्या खर्च! झडू द्या पार्ट्या

२८ लाखांची मर्यादा झाली ४० लाख

✔ सोलापूर/प्रतिनिधी

निवडणूक म्हटलं की कार्यर्त्यांची मर्जी सांभाळणं, त्यांची सोय पाहणं यावर उमेदवारांना लक्ष पुरवावं लागतं. कार्यकर्ते तसेच प्रसंगी लोकशाहीचा झेंडा आडवा करणाऱ्या, मिळाली संधी म्हणून हात धुवून घेण्यात धन्यता मानणाऱ्या मतदारांसाठी सामिष भोजनाच्या पार्ट्या उमेदवारांना कराव्याच लागतात. ते करताना निवडणूक आयोगाला त्याचा हिशोब देण्याचं झंझट उमेदवारांना असतं. एकीकडे खर्च अफाट असतो, अन् दुसरीकडं निवडणूक आयोगाची खर्चाची मर्यादा अत्यंत कमी असते. निवडणूक आयोगला खर्च सादर करताना उमदेवारांना मोठी डोकेदुखी असते. पण या खेपेस उमदेवारांना तितकीशी डोकेदुखी असणार नाही. कारण विधानसभेची निवडणूक लढविणाऱ्या इच्छुकांसाठी खर्चाची मर्यादा आणि २८ लाखांवरुन ४० लाख केली आहे, शिवाय महत्त्वाचं म्हणजे सध्याच्या महागाईचा विचार करता भोजन, चहा यांच्या वाढीव दराला निवडणूक आयोगानं परवानगी दिली आहे. विविध २५२ प्रकारच्या खर्चाची सांगड महागाईशी घालण्यात आली आहे.

विधानसभेसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. उमेदवारांनी केलेला खर्च उमेदवाराला निवडणूक आयोगाला सादर करावा लागणार आहे. उमेदवारांनी केलेल्या खर्च आणि सादर केलेल्या खर्चाची निवडणूक शाखेकडून पडताळणी केली जाणार आहे. या वेळी निवडणूक आयोगाने वाढती महागाई लक्षात घेऊन उमेदवाराला ४० लाखांपर्यंत खर्च करण्याची उभा दिली आहे. यापूर्वी ही मर्यादा २८ लाखांची होती. यामध्ये या वेळी वाढ करण्यात आली आहे. बैठका, सभा, रॅली, जाहिरात पत्रक, वाहनांचा खर्च आदींचा यामध्ये समावेश आहे. हा सर्व खर्च निवडणूक आयोगाच्या नियमांच्या अधीन राहून करावा लागणार आहे. यासाठी जिल्हा निवडणूक शाखेने खर्चाचे दर निश्चित केले आहेत. उमेदवारी अर्ज दाखल केल्यापासून हा खर्च ग्राह्य धरला जातो. यासाठी उमेदवारांना राष्ट्रीयीकृत किंवा सहकारी बँकेत खाते उघडावे लागते. अर्ज दाखल करताना उमेदवाराला खर्चाच्या नोंदीसाठी रजिस्टर दिले जाते. त्यामध्ये उमेदवारास निवडणूक काळातील खर्च दैनंदिन खर्च नोंद करणे अनिवार्य आहे.

प्रचार ताफ्यातील वाहनांसाठी दरांचा गिअर



प्रचारासाठी वापरण्यात येणाऱ्या वाहनांचे दरही ठरवण्यात आले आहे. त्यानुसार दुचाकी एक दिवसासाठी एक हजार शंभर रुपये, रिक्षा १३०० रुपये, हलके वाहन ३ हजार ३०० रुपये, मध्यम वाहन ३९००, उच्च दर्जाचे वाहन ५१०० रुपये असा दर ठरवण्यात आला आहे.

पुष्पगुच्छ, हार घेताय, मग 'हे' लागणार दर

पुष्पगुच्छ मोठा २२० रुपये, पुष्पगुच्छ मध्यम १८० रुपये, पुष्पगुच्छ लहान शंभर रुपये, हार मोठा ३२५, मध्यम २३५ रुपये, लहान १२५ रुपये असा दर ठरवण्यात आला आहे.

कारवाईची टांगती तलवार

विधानसभा निवडणुकीसाठी निवडणूक आयोगाने प्रचार खर्चासाठी एकूण २५२ खर्चांच्या गोष्टीसाठी दरसुची जाहीर केली असून ठरवून दिलेल्या दरापेक्षा जास्त खर्च केल्यास आचारसंहितेचा भंग केल्यास उमेदवारांवर कारवाई केली जाणार. निवडणूक आयोगाने कारवाईची टांगती तलवार उमेदवारांच्या डोक्यावर ठेवली आहे.

मटण थाळी १२०, चहा ८ रुपये !

निवडणूक आयोगानं खर्चाच्या सुचीला मान्यता देताना शाकाहारी थाळी ७०, मांसाहारी थाळी १२०, पोहे, शिरा, उपमा प्रति प्लेट १५ रुपये चहा प्रति कप ८ रुपये याप्रमाणे मंजूरी दिली आहे.

बँड अन् हलगी पथकांसाठी हे 'दर'

बँडपथक वीस माणसांसाठी प्रतिदिन एक हजार रुपये, पाच माणसांचे पोवाडा पथक पाच हजार रुपये, तीन माणसांचे हलगी पथक १५०० रुपये, २० जणांचे झांजपथक १० हजार रुपये, शिंगवादन प्रतिव्यक्ती तीनशे रुपये, बँजो ग्रुप चार माणसांसाठी तीन-चार तासांसाठी २५०० रुपये

करमाळ्यात संजयमामांच्या विरोधात नारायणआबा

✔ सोलापूर/प्रतिनिधी

अपेक्षेप्रमाणे करमाळा मतदार संघात राष्ट्रवादी शरद पवार गटानं अकलूजकर मोहिते-पाटील यांच्या शिफारशीनुसार, माजी आमदार नारायण पाटील यांना उमेदवारी देऊन आपल्या पक्षाच्यावतीने आखाड्यात उतरवलं आहे. या मतदार संघात विद्यमान आमदार संजयमामा शिंदे आणि नारायण पाटील यांच्या सामना होणार आहे.

विशेषत्वे, आमदार शिंदे यांनी या मतदार संघातून अपक्ष उमेदवारी लढविण्याच्या निर्णय जाहीर केल्यानं महायुतीकडून या मतदार संघात उमेदवार दिला जाणार की नाही? हे गुरुवार (ता.२४) पर्यंत अनश्चित राहात आहे.

एकनाथ शिंदे शिवसेना गटाची उमेदवारी या मतदार संघात असायलाच हवी, असा घाट शिंदे शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांचा आहे. मात्र, करमाळ्याच्या जागेवर आमदार संजयमामा शिंदे यांच्या विरोधात उमेदवार द्यायची की नाही, याचा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि देवेंद्र फडणवीस यांनी निश्चितपणे निर्णय घेतला असावा.

करमाळ्याची जागा स्वत:कडे घेऊन लढण्यासंबंधी भाजपच्यादेखील हालचाली आहेत. लोकसभा निवडणुकीपूर्वी भाजपमध्ये प्रवेश केलेल्या बागल गटानं दिग्विजय बागल यांचे नाव करमाळ्यातून लढण्यासाठी पुढे केले आहे. अशातच शिंदे शिवसेनेचे नेते मंगेश चिवटे यांनी धनुष्यबाणावर निवडणूक लढवण्यासाठी तयारी ठेवली आहे. शिंदे सेनेचे प्रमुख मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या ते संपर्कात आहेत. असे असले तरी करमाळ्याची जागा महायुतीत शिवसेना की भाजप यापैकी कोणाल सुटणार? यावर इथल्या निवडणुकीचं गणित अवलंबून आहेत.

धनगर व्होट बँकेवर नजर; पाटलांना उमेदवारी

पश्चिम महाराष्ट्रातील करमाळा, सांगेला, माळशिरस या पट्ट्यात धनगर समाजाची लोकसंख्या मोठी आहे. राष्ट्रवादीच्या तिकीट वाटपात सामाजिक संतुलन राखणं हा विषय होताच होता. धनगर समाजाला न्याय देणं महत्त्वाचं होतं. माजी आमदार नारायण पाटील हे धनगर समाजाचे नेते आहेत. 'आपला माणूस' ही टॅगलाईन या मतदार संघात पाटील यांच्याबाबतीत चालेल. हे लक्षात घेता, शरद पवारांनी पाटील यांच्या उमेदवारीवर शिक्कामोर्तब केलं.

पाया लोकसभेला तर कळस विधानसभेवेळी

लोकसभा निवडणुकीवेळी करमाळा मतदार संघात मोठ्या राजकीय घडामोडी झाल्या होत्या. विधानसभा निवडणुकीची गणितं यावेळी घालण्यात आली होती. लोकसभेला मोहिते-पाटील यांना निवडून आणताना विधानसभेला नारायण पाटील यांना उमेदवारी देऊन निवडून आणण्याचा विषय ठरला होता. पाटील यांच्या विधानसभा लढण्याचा पाया हा लोकसभेला घातला गेला होता, आता कळस काढला जाणार आहे.

शिंदे सेनेच्या सोलापुरातील नेत्यांचे बंड

✔ सोलापूर/प्रतिनिधी

भाजपाच्या पराभवाचा दिला इशारा

महायुतीमधील घटक पक्ष असलेल्या एकनाथ शिंदे शिवसेना गटाचे सोलापूर जिल्ह्यातील नेते, पदाधिकारी अन् प्रमुख कार्यकर्ते प्रचंड आक्रमक झाले असून सोलापूर शहर मध्यची जागा भाजपला सुटल्यास महायुतीचा धर्म न पाळता जिल्ह्यातील भाजपच्या वाट्याचे ५ ठिकाणचे उमेदवार पाडू, भाजपच्या पाच जागांवर शिंदे सेनेचे उमेदवार उभा करु,प्रसंगी त्यांनाही संपवू असा खणखणीत इशारा त्यांनी आज गुरुवारी (ता.२४) दिला आहे.

दरम्यान, सोलापूर शहर मध्यच्या जागेसंबंधी आता हाय व्होल्टेज ड्रामा होत असून शिंदे शिवसेना गटाचे प्रमुख एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे काय भूमिका घेतात? याकडे लक्ष लागून राहिलं आहे. शिंदे सेनेचे जिल्हाध्यक्ष अमोल शिंदे पत्रकार परिषदेत म्हणाले, सोलापूर लोकसभेच्या मतदार संघात समाविष्ट असलेल्या सहा पैकी तब्बल पाच जागांवर भाजप निवडणूक लढवत आहे. दुसऱ्या बाजूला शिंदे सेनेला एकही जागा मिळत नसावी हे दूर्दैवं आणि विरोधाभास आहे. सन २०१९ च्या निवडणुकीत सोलापूर शहर मध्यची जागा ही शिवसेनेच लढली होती. या खेपेस या जागेवर शिवसेनेचाच दावा आहे. तरीपण शिवसेनेच्या वाट्याच्या जागेवर भाजपचं अतिक्रमण होणार असल्याचा बातम्या प्रसारमाध्यमांमधून सातत्यानं झळकत असल्यानं शिंदे सेनेचे नेते, पदाधिकारी, प्रमुख कार्यकर्ते सगळेच अस्वस्थ झाले आहेत, शिवसेनेच्या हक्काची जागा भाजपला का ? असा सवाल सर्वांचा आहे, असे शिंदे यांनी सांगितले. उमेदवारी अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी आम्ही शिंदे सेनेच्यावतीने उमेदवारी भरु.

अस्मितेची लढाई

शिवसेनेच्या अस्तित्वाच्या लढाईसाठी आम्ही भाजपचे उमेदवार पाडण्याची भूमिका घेत आहोत. या निर्णयाचा महाराष्ट्रातील युतीशी संबंध नाही. सोलापूर जिल्ह्यातील शिवसैनिकांच्या अस्तित्वाची लढाई आहे. सोलापूर शहर मध्यची जागा शिंदे शिवसेना गटाला न सुटल्यास आम्ही भाजपच्या पाचही मतदार संघात ताकद दाखवू. आम्ही पाच-दहा मतं घेऊ विधानसभा निवडणुकीत सोलापूर जिल्ह्यातील भाजप संपवू, असेही अमोल शिंदे म्हणाले.

बाळासाहेब ठाकरेंचा फोटो लावूनच करेक्ट कार्यक्रम

स्व. बाळासाहे ठाकरे यांचा फोटो घेऊन भाजपनं राज्यात सत्ता आणली, त्याच बाळासाहेब ठाकरेंचा फोटो घेऊन आम्ही सोलापूर जिल्ह्यातील ५ ठिकाणी भाजपचा करेक्ट कार्यक्रम करुन दाखवू, असे शिंदे म्हणाले.

शिंदे सेनेचे संभाव्य उमेदवार

- सोलापूर शहर उत्तर मतदार संघ : अमोल शिंदे
- सोलापूर शहर मध्य मतदार संघ : मनोज शेजवाल
- अक्कलकोट विधानसभा मतदार संघ : अभिजित पाटील
- सोलापूर शहर दक्षिण मतदार संघ : आबासाहेब दत्तू, उमेश गायकवाड
- पंढरपूर-मंगळवेढा मतदार संघ : अशोक चौडे

काँग्रेसच्या यादीचा उडाला बार

अक्कलकोटमधून पुन्हा म्हेत्रेंच 'मध्य'चा विषय मागेच



✔ सोलापूर/विशेष प्रतिनिधी

महाराष्ट्र विधानसभा निवडणूक २०२४ साठी आता सर्वपक्षीय उमेदवार याद्या जाहीर होत आहेत. महाविकास आघाडीच्या उमेदवारी यादीची उत्सुकता लागली होती. आता काँग्रेसने त्यामध्ये बाजी मारली आहे. काँग्रेसने आपली पहिली उमेदवारी यादी जाहीर केली आहे. पहिल्या उमेदवारी यादीमध्ये ४८ उमेदवारांचा समावेश आहे. काँग्रेसच्या पहिल्या यादीमध्ये माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, बाळासाहेब थोरात यासारख्या ज्येष्ठ आमदारांचा समावेश आहे. विशेषत्वे, सोलापूर जिल्ह्यातील बहुचर्चित अक्कलकोट विधानसभेच्या मतदार संघातून माजीगृहमंत्री सिद्धाराम म्हेत्रे यांना पुन्हा उमेदवारी देण्यात आली आहे. खासदार प्रणिती शिंदे यांचा मतदारसंघ असलेल्या सोलापूर शहर मध्यमधील उमेदवारीचा विषय लांबणीवर टाकल्याचं स्पष्ट होतं. कारण या मतदार संघाचं नाव यादीत समाविष्ट नाही.

३७ जागेची घोषणा अद्याप बाकी

महाविकास आघाडीमधील घटक पक्ष काँग्रेसने विलंबाने गुरुवारी ४८ जणांची यादी जाहीर केली आहे. ८५ जागा या पक्षानं स्वत:कडं घेतल्याचं गणित घातल्यास अद्याप ३७ जागेची घोषणा होणं बाकी आहे. त्या जागेची घोषणा शुक्रवारी रात्रीपर्यंत होऊ शकते.

लोकसभेच्या धंगेकर विधानसभेला पुन्हा

लोकसभा निवडणुकीच्या आखाड्यात पुण्याच्या कसबा पेठ लोकसभेच्या मतदार संघातून रवींद्र हेमराज धंगेकर यांना काँग्रेसनं उतरवलं होतं. मात्र, या निवडणुकीत त्यांचा पराभव झाला होता. धंगेकर यांना पुन्हा कसबा पेठ विधानसभेच्या मतदार संघातून काँग्रेसनं उमेदवारी देऊन उभं केलं आहे.

काँग्रेसच्या उमेदवारांची यादी

कलकुवा - के.सी. पडवी, शहादा - राजेंद्रकुमार कृष्णराव गावित, नंदुरबार - किरण दामोदर तडवी, नवापूर - श्रीकृष्णकुमार सुरुपसिंग नाईक, साक्री - प्रवीणबापू चौरे, धुळे ग्रामीण - कुणाल रोहिदास पाटील, रावेर - धनंजय शिरीष चौधरी, मलकापूर - राजेश पंडितराव एकाडे, चिखली - राहुल सिद्धिविनायक बोंद्रे, रिसोड -अमित सुभाषराव झनक, धामणगाव रेल्वे -प्रा.वीरेंद्र वाल्मीकराव जगताप, अमरावती - डॉ. सुनील देशमुख, औसा - यशोमती चंद्रकांत ठाकूर, अचलपूर - अनिरुद्ध बबलूभाऊ सुभानराव देशमुख, देवळी - रणजित प्रताप कांबळे, नागपूर दक्षिण पश्चिम - प्रफुल्ल विनोदराव गुडधे, नागपूर मध्यवर्ती - बंटी बाबा शेळके, नागपूर पश्चिम - विकास पी. ठाकरे, नागपूर उत्तर - डॉ. नितीन काशिनाथ राऊत, साकोली - नानाभाऊ फाल्गुनराव पटोले, गोंदिया- गोपालदास शंकरलाल अग्रवाल, राजुरा- सुभाष रामचंद्रराव धोटे, ब्रह्मपुरी - विजय नामदेवराव वडेट्टीवार, चिमूर - सतीश मनोहरराव वारजूकर, हदगाव - माधवराव निवृत्तीराव पवार पाटील, भोकर- तिरुपती बाबुराव कदम कोंडेकर, नायगाव - मीनल निरंजन पाटील (खतगावकर), पाथरी - सुरेश अंबादास वरपुडकर, फुलंब्री - विलास केशवराव औताडे, मीरा भाईंदर - सय्यद मुजफ्फर हुसेन, मालाड पश्चिम - अस्लम आर. शेख, चांदिवली - मोहम्मद आरिफ नसीम खान, धारावी - डॉ.ज्योती एकनाथ गायकवाड, मुंबादेवी - अमीन अमीराली पटेल, पुरंदर - संजय चंद्रकांत जगताप, भोर - संग्राम अनंतराव थोपटे, कसबा पेठ - रवींद्र हेमराज धंगेकर, संगमनेर - विजय बाळासाहेब थोरात, शिर्डी - प्रभावती जे.घोगरे, लातूर - ग्रामीण धिरज विलासराव देशमुख, लातूर शहर - अमित विलासराव देशमुख, अक्कलकोट - सिद्धाराम सातलिंगप्पा म्हेत्रे, कराड दक्षिण - पृथ्वीराज चव्हाण, कोल्हापूर दक्षिण - रुतुराज संजय पाटील, करवीर - राहुल पांडुरंग पाटील, हातकणंगले - राजू जयंतराव आवळे, पलूस-कडेगाव - डॉ.विश्वजीत पतंगराव कदम, जाट - विक्रमसिंह बाळासाहेब सावंत

'तुतारी'चं घड्याळापुढं तगडं आव्हान

४५ जणांची फुटली भेंडी; शरद पवारांनी अजितदादांना घेतलं शिंगावर

✔ सोलापूर/विशेष प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या उमेदवारांच्या नावाची यादी गुरुवारी जाहीर करण्यात आली आहे. यामध्ये ४५ जणांना उमेदवारी देण्यात आली आहे. पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी उमेदवारांच्या नावाची भेंडी फोडली आहे. यामध्ये काही ठिकाणी नवीन चेहऱ्यांना संधी दिली आहे. तर काही मतदारसंघात सस्पेंन्स कायम ठेवला आहे. यामध्ये माढा, मोहोळ, परांडा तसेच पंढरपूर मतदारसंघाचा समावेश आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी ४५ उमेदवारांच्या नावाची घोषणा केली आहे. मात्र, यामध्ये काही महत्वाच्या मतदारसंघात उमेदवारांच्या नावाची घोषणाच केली नाही. यामध्ये माढा, मोहोळ, परांडा तसेच पंढरपूर मतदारसंघाचा समावेश आहे. या मतदारसंघात उमेदवारी कोणाला द्यायची याचा पेच कायम आहे. कारण या चारी मतदारसंघात इच्छुकांची संख्या मोठी आहे. त्यामुळं उमेदवारीचा तिढा कायम आहे. त्यामुळं या सर्व मतदारसंघात चर्चा करुनच उमेदवारी घोषीत करण्यात येणार असल्याचे जयंत पाटील यांनी सांगितले.

महाविकास आघाडीतील राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार पक्षाची पहिली ४५ उमेदवारांची अधिकृत यादी जाहीर करण्यात आली आहे. त्यामध्ये, शिवसेना ठाकरे गटाप्रमाणेच शरद पवारांनीही राष्ट्रवादीच्या अजित पवारांना तगडं आव्हान दिलंय. सर्वांचं लक्ष लागलेल्या बारामती विधानसभा मतदारसंघात थेट अजित पवार विरुद्ध युगेंद्र पवार म्हणजेच काका विरुद्ध पुतण्या अशी लढत होणार आहे. अहेरी मतदारसंघातून भाग्यश्री आत्राम यांना उमेदवारी जाहीर झाली आहे. त्यामुळे, महायुती विरुद्ध महाविकास आघाडीच्या लढाईत घड्याळाला तुतारीचं मोठं आव्हान निर्माण झालंय.

गडचिरोली-चिमूर लोकसभा मतदारसंघात सहा विधानसभा क्षेत्र आहेत, त्यापैकीच एक म्हणजे अहेरी विधानसभा मतदारसंघ. या मतदारसंघाचे राजकीय दृष्टिकोनातून वेगळे महत्त्व आहे. त्यामुळे युती असो की आघाडी, या दोघांनीही अहेरी मतदारसंघावर लक्ष केंद्रित केलं आहे. अखेर आज शरद पवारांच्या राष्ट्रवादीची उमेदवारी जाहीर झाली असून बाप विरुद्ध लेक असा सामना फिक्स झालंय. तर, बारामती मतदारसंघातून युगेंद्र पवार यांना तिकीट देऊन अजित पवारांना मोठं आव्हान उभा केलंय.

बाप विरुद्ध लेक, काका विरुद्ध पुतण्या घड्याळाला तुतारीचं मोठं आव्हान

शरद पवार गटानं ४५ उमेदवार वारांची पहिली यादी जाहीर केली आहे. यानुसार बारामतीत पवार घराण्यातच हाय व्होल्टेज ड्रामा दिसणार युगेंद्र पवार विरुद्ध अजित पवार अशी काका पुतण्यातच जोरदार फाईट होणार आहे. शरद पवारांनी युगेंद्र पवार यांना आखाड्यात उतरवलं आहे. आत्राम परिवारात बाप विरुद्ध लेक असाही सामना लावण्यात आला आहे. शरद पवारांनी अजित पवारांना मोठं आव्हान दिलं आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाची यादी

जयंत पाटील - इस्लामपूर, अनिल देशमुख- काटोल, राजेश टोपे- घनसावंगी, बाळासाहेब पाटील-कराड उत्तर, जितेंद्र आव्हाड- कळबा मुंब्रा, शशिकांत शिंदे - कोरेगाव, जयप्रकाश दांडेगावकर- वसमत, गुलाबराव देवकर- जळगाव ग्रामीण, हर्षवर्धन पाटील- इंदापूर, प्राजक्त तनपुरे -राहुरी, अशोकराव पवार- शिरुर, मानसिंगराव नाईक- शिराळा, सुनील भुसारा- विक्रमगड, रोहित पवार- कर्जत जामखेड, विनायकराव पाटील- अहमदपूर, राजेंद्र शिंगणे- सिंदखेडराजा, सुधाकर भालेराव- उदगीर, चंद्रकांत दानवे- भोकरदन, चरण वाघमारे- तुमसर, प्रदीप नाईक- किनवट, विजय भांबळे-जिंतूर, पृथ्वीराज साठे- केज, संदीप नाईक- बेलापूर, बापूसाहेब पठारे- वडगाव शेरी, दिलीप खोडपे- जामनेर, रोहिणी खडसे- मुक्ताईनगर, सम्राट डोंगरदिवे-मुर्तिजापूर, रविकांत बोपछे- तिरोडा, भाग्यश्री अत्राम- अहेरी, बबलू चौधरी- बदनापूर, सुभाष पवार- मुरबाड, राखी जाधव- घाटकोपर पूर्व, देवदत्त निकम- आंबेगाव, युगेंद्र पवार - बारामती, संदीप वर्पे- कोपरगाव, प्रताप ढाकणे- शेवगाव, राणी लंके- पारनेर, मेहबूब शेख- आष्टी, करमाळा-नारायण पाटील, महेश कोठे-सोलापूर शहर उत्तर, प्रशांत यादव- चिपळूण, समरजीत घाटगे - कागल, रोहित आर आर पाटील- तासगाव कवठेमहाकाळ, प्रशांत जगताप -हडपसर.